वितरण आदेश क्र.२
सन २०१९-२०२०

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर, (उत्तर), पैठण, जिल्हा - औरंगाबाद
सहाय्यक अनुदान २०१९-२०२० (अनिवार्य)
एप्रिल ते जुलै २०१९ (पहिला हप्ता)

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मप्रप्र २०१९/प्र.क्र.५०/१९/१२ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक २२ एप्रिल, २०१९

<u>वाचा :</u> १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थसंकल्प ३, दि.१ एप्रिल, २०१९.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. - बीयुडी-२०१९/ प्र.क्र.९६ /२०१९/२५, दि.१ एप्रिल, २०१९

शासन निर्णय

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, जिल्हा-औरंगाबाद या संस्थेला सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या योजनेतर खर्चासाठी संदर्भाधीन क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये वेतनेतर रु.१५.०० लाख व वेतने रु.१२९.०० लाख अशी एकूण रु. १४४.०० लाख (अक्षरी रुपये एकशे चव्वेचाळीस लाख फक्त) इतकी तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी रु. ७२.०० लाख (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) एवढे लेखा अनुदान एप्रिल ते जुलै २०१९ या चार महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी संदर्भाधीन क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये मंजूर झाले आहे. सदर अनिवार्य सहाय्यक अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

२. **मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, जिल्हा-औरंगाबाद या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यासाठी एप्रिल ते जुलै २०१९ या चार महिन्यांकरिता लेखाअनुदानाच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले वेतनेतर रु.७,५०,०००/- व वेतने रु.६४,५०,०००/- असे एकूण रु.७२,००,०००/- (रुपये बहात्तर लाख फक्त) इतके अनिवार्य सहाय्यक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात येत आहे.**

३ हा खर्च मागणी क्र. ए-४, मुख्य लेखाशिर्ष "२०७० - इतर प्रशासनिक सेवा - ००३ - प्रशिक्षण (००) (०७) मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेस सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२०७० ०७४६) याखाली सन २०१९ -२०२० या आर्थिक वर्षासाठीच्या मंजूर तरतुदीतून "३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) " याखाली रु रु. ७,५०,००० /-(रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) व "३६ सहाय्यक अनुदाने (वेतने)" याखाली रु. ६४,५०,०००/- (रुपये चौसष्ट लाख, पन्नास हजार फक्त) याप्रमाणे भागविण्यात यावा..

४. सदरहू मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची संबंधित कोषागारातून काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र १५ दिवसांच्या आत शासनास सादर करावे.

५. संस्थेने आर्थिक वर्ष २०१९-२०२० मधील मंजूर अनुदानाइतका खर्च सिमित ठेवावा.

६. संस्थेने आता वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशीलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

७. मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, जिल्हा-औरंगाबाद या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार, महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

८. मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, जिल्हा-औरंगाबाद या संस्थेने वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र.६ मध्ये नमूद केल्यानुसार देयक कोषागार अधिकारी यांना सादर करतांना संस्थेचे मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) देयकासोबत जोडण्यात यावे.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि १.४.२०१९.च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद ६ व ७ मधील अटींच्या अधीन राहून व वित्त विभागाच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग एक, अनुक्र२७., परिच्छेद क्र १४९.नुसार व सदर अधिकारातील रकाना क्र ६.खालील अटींच्या अधीन राहून प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४२२११००१९८७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAYKUMAR PARSHURAM SOSHTE

Digitally signed by VIJAYKUMAR PARSHURAM SOSHTE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=106ede43bb7dcc67e6404aaa146fb4c17a872b3754b63c343b66d6b91dd6b276, postalCode=400032,
street=MANTRALAY,MUMBAI,
serialNumber=fcd4ff3afd509df3fc67125633068a99581fcb49f2e903b1bf93a7ffff868e12, ou=GENERAL ADMINISTRATION,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIJAYKUMAR PARSHURAM SOSHTE
Date: 2019.04.22 11:02:55 +05'30'

(वि.प.सोष्टे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति:-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
४) संचालक, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, औरंगाबाद
५) उप संचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद
६) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद

७) उप कोषागार कार्यालय, पैठण, जि.औरंगाबाद.
८) वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प १४), मंत्रालय, मुंबई
९) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक-२५. मंत्रालय, मुंबई
१०) मा. अ.मु. स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) निवड नस्ती. (सामान्य प्रशासन विभाग/कार्या. १२ अ)